दै. देशोन्नती.

# पोलिस कारवाईत दोन गावठी पिस्तुल, दोन जिवंत काडतुस जप्त

■ इतवारा पोलिसांनी कारवाई, एकजण ताब्यात



देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी करण्यासाठी पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लश आऊटनुसार कारवायांनी वेग घेतला असून याच मोहिमेंतर्गत इतवारा पोलिसांनी ३१ ऑगस्ट रोजी केलेल्या कारवाईत एकास ताब्यात घेतले असून त्याच्याकडून दोन गावठी पिस्तुल व दोन जिवंत काडतुस जप्त केले.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, इतवारा ठाण्याचे पोलिस निरीक्षक रणजीत भोईटे यांनी हद्दीतील अवैद्य अग्नीशस्त्र बाळगणारे आरोपी विरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्याबाबत गुन्हे शोध पथकातील पोउपनि. रमेश गायकवाड, सपोउपनि. देविदास बिसाडे, पोहेकॉ मोहन हाक्के, लक्ष्मण दासरवार, धिरजकुमार कोमुलवार, चाऊस, संघरत्न गायकवाड यांना आदेश दिले होते. ३१ ऑगस्ट रोजी डी. बी. पथकास बाफना टी पॉईन्ट लस्सीचे दुकानासमोर सार्वजनिक रोडच्या कडेला एक इसम त्याच्या कमरेला दोन गावठी पिस्तुल लावुन थांबलेला आहे, अशी माहिती मिळाली. या माहितीवरून पथकाने सापळा रचुन आरोपी योगेश पवार (१९) रा. बरडशेवाळा ता. हदगाव यास ताब्यात घेवुन अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला दोन गावठी पिस्तुल व दोन जिवंत काडतुस असा एकुण ५० हजार ६०० रूपयाचा मुद्देमाल त्याचे ताब्यातुन जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीविरुद्ध इतवारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोउपनि. रमेश गायकवाड हे करत आहेत.

दै. गोदातीर.

# भाग्यनगर पोलिसांकडून १२ तासांत गुन्हा उघड

**नांदेड–** भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीचा गुन्हा घडला होता. तो अवघ्या १२ तासांत उघड करून गुन्ह्यातील सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीची घटना घडली होती. त्यातील चोरीस गेलेला माल एका विधीसंघर्ष बालकास ताब्यात घेऊन जप्त करण्यात आला. त्यामध्ये दोन पेन्डॉल, सोन्याची १६ मनी, एक सोन्याची चैन, एक घडी असे चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला. हा गुन्हा अवघ्या १२ तासांत उघडकीस आणल्याने पोलीस अधीक्षक यांच्याकडून भाग्यनगर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.